नि.फौ.ख.क्र.१६९/२०२०
सरकार वि. प्रतिक
नि.क्र.२४

साक्षीदार क्र **०१** ची उलटतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–मुकेश सोपान ढेपे,
वय:–६४ वर्ष, व्यवसाय–मजुरी
राह.सडेश्वर, ता.उमरेड, जि.नागपूर.

**नि.क्र.४७ वरिल आदेशान्वये अतिरिक्त उलटतपास आरोपीतर्फे श्री. एस.बी.त्रिवेदी यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

दोन्ही आरोपी माझे मुले आहेत. सदरचे प्रकरण प्रलंबित असतांना माझा व माझ्या मुलांमधील वाद मिटलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा वाद मिटल्यामुळे दि.२३.०२.२०२६ रोजी मी तसा अर्ज केला होता व तशी तडजोड झाल्याची पुरसिस नि.क्र.४८ वर दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, बकरीचे शेड बांधण्याच्या कारणावरून माझ्या मुलांमध्ये व माझ्यामध्ये वादविवाद झाल्यामुळे मी माझ्या मुलांविरूध्द फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला काही मारहाण केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी मी माझ्या मुलांसोबत राहतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे माझ्या मुलांसोबत चांगले संबंध आहे व त्यामुळे मला आरोपीविरूध्द केस पुढे चालवायची नाही. माझ्या सरतपासामध्ये सांगितलेला मजकुर 'आरोपीने मला मारहाण केली' हा मी अनावधानाने सांगितला आहे. मला सदर मारहाणीमध्ये काहीही दुखापत झालेली नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२७.०४.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड